# वनहक्क, वन निवासी व वन्यीजवप्रेमी संस्था

Advertisement

MT | Updated: 17 Mar 2019, 4:00 am

वनहक्क, वन निवासी व वन्यजीवप्रेमी संस्थाअनुजा दाते, केशव गुरनुलेअवनी वाघिणीची गोष्ट असो किंवा मेळघाट व्याघ्र प्रकल्पामुळे विस्थापितांवर झालेले ...

© MT

Advertisement


## तुमच्यासाठी

स्मार्ट मुलांसाठी स्मार्ट डिव्हाइसेस - लॅपटॉप, टॅब्लेट आणि बरेच काही! Amazon वरून उत्तम सवलतींसह...



शॉप नाऊ

करिअर/व्यवसाय वाढीचे रहस्य काय आहे? आता या कोर्ससह एआय शोधा! नोंदणी करा 15,000 रुपयामध्ये



नोंदणी करा


वनहक्क, वन निवासी व वन्यजीवप्रेमी संस्था

अनुजा दाते, केशव गुरनुले

अवनी वाघिणीची गोष्ट असो किंवा मेळघाट व्याघ्र प्रकल्पामुळे विस्थापितांवर झालेले अत्याचार असो, २०१९ या वर्षाची सुरुवात वन्यजीवप्रेमी व आदिवासींमध्ये तिढा निर्माण करणारी झालेली आहे. त्यात आणखी भर पडली ती फेब्रुवारी १३, २०१९ ला सर्वोच्च न्यायालयाने वन हक्क कायद्यावर दिलेल्या जाचक आदेशामुळे. २००८ साली काही वन्यजीवप्रेमी संस्थांनी वनहक्क कायद्याच्या वैधतेवर प्रश्न उठवणारी याचिका दाखल केली होती. त्यातीलच एका सुनावणीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले की, या कायद्याअंतर्गत ज्यांचे वन हक्काचे दावे नाकारण्यात आले आहेत त्या दावेदारांना वन जमिनीवरून हटवण्यात यावे. आदिवासी जनतेने या सुनावणीविरुद्ध आवाज उठवल्यानंतर सरकारने ही बाब सर्वोच्च न्यायालयासमोर ठेवून या निर्णयावर काही काळासाठी स्थगिती आणली.

या सुनावणीनंतर आदिवासींच्या हक्कांविरोधी याचिका वन्यजीवप्रेमी संस्थांनी का दाखल केली, हा प्रश्न चर्चेत आला. वनहक्कविरोधी याचिका दाखल करण्यामागे वन्यजीवप्रेमी संस्थांचे अन्यायी, अशास्त्रीय व इतिहासाकडे कानाडोळा करणारे काही युक्तिवाद कारणीभूत आहेत. वनहक्कांमुळे १७ लाख हेक्टरहून अधिक जंगल शेतीमध्ये परिवर्तीत होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, असे या संस्थांचे म्हणणे आहे. वनहक्काच्या जमिनीमुळे जंगल विभाजित होते, असा त्यांचा दावा आहे. पण या दाव्यांनी दिशाभूल होत आहे. ती कशी, हे समजून घेण्यासाठी आधी आपण वनहक्क कायदा समजून घेतला पाहिजे.

वनहक्क कायदा ब्रिटिश सरकारपासून अलीकडेपर्यंत झालेल्या अन्यायी वन्य जमीन नोंदणीला दुरुस्त करण्यासाठी बनवलेला कायदा आहे. वैयक्तिक व सामूहिक अशा दोन प्रकारचे हक्क आहेत. वैयक्तिक वनहक्काअंतर्गत आदिवासींना २००५च्या आधीपासून असलेल्या शेतीवर हक्काचा पट्टा मिळतो. यात वन जमिनीवर इतर वन-निवासींची (दलित व इतर


## हेही वाचा

आणखी वाचा >




मृतदेहासाठी वापरलेला बर्फ गटारातून काढून पाणी थंड करण्यासाठी वापरला,...

Advertisement



आम्ही २०-२५ धावा तिथेच गमावल्या...मुंबईच्या पराभवाचे एकमेव कारण कोणतं, हार्दिकने...

जाती) शेतं आहेत, तिथे त्यांना ७५ वर्षे शेतीच असल्याचे पुरावे सादर केल्यावर हक्काचा पट्टा मिळतो. म्हणजेच वैयक्तिक शेतीची नोंद जिथे धोरणात्मक चुकीमुळे जंगल म्हणून केली गेली होती, तिथलेच हक्क मंजूर होतात. वनहक्काचा दुसरा प्रकार म्हणजे सामूहिक वनहक्क. यात गावाच्या पारंपरिक हद्दीतील जंगल सरकारी जंगल म्हणून बळकावले गेले होते. तिथले जंगल सामूहिक वनहक्काअंतर्गत गावाला परत केले जाते. या जंगलावर ग्रामसभेचा हक्क असतो. तेथील जंगलाची व वनउपज वापराच्या नियोजनाची जवाबदारी ग्रामसभेकडे असते. यावरून असे दिसते की, कायद्याची पूर्ण अंमलबजावणी झाली तर वनहक्क कायद्याअंतर्गत आधी असलेल्या कोणत्याच जमीन वापराच्या पद्धतीत बदल करता येत नाही. म्हणजेच जंगल असलेली कोणतीही जमीन नव्याने शेतीमध्ये बदलता येत नाही.



हार्दिक पंड्या भिडला तर गुजरातच्या खेळाडूनेही दिली ठसन, व्हिडिओमध्ये पाहा कसा...



5000 वर्षांनंतरही इजिप्तमध्ये ममींमधून सुगंध येतोय, मोठं गूढ उलगडलं



Fact Check: सौदी अरेबियात भारतीय महिलेने सुरक्षारक्षकाच्या कानशिलात लगावली? सत्य...


महिला कॉमेडियनवर अश्लीलता पसरवल्याचा आरोप; आईवरुन विनोद केल्याने नेटकऱ्यांच्या...


पाणी भरणारी हवी पण..., तरुणानं मेरठ हत्याकांडानंतर बनवला असा व्हिडीओ, पुण्या...

Advertisement


सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीमुळे दुसरा प्रश्न उद्भवतो, तो म्हणजे आदिवासींचे व इतर वननिवासींचे वनहक्कांचे दावे नामंजूर होण्यामागे काय कारणे असतील? वनहक्क कायद्याची अंमलबजावणी चांगली व्हावी म्हणून वनहक्क कायद्याअंतर्गत जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया ग्रामसभेपासून सुरू होऊन टप्प्या-टप्प्याने राज्यस्तरापर्यंत जाते. ही प्रक्रिया ग्रामसभेमधील वनहक्क समितीने सुरू करायची असते. वनहक्क समितीला ग्रामस्थ, स्थानिक वनाधिकारी व पटवारी यांच्यात समन्वय साधून वनहक्काचे दावे पूर्ण करायचे असतात. परंतु, यासाठी ग्रामसभांना शासनाकडून मदत मिळणे गरजेचे असते. वनहक्क कायद्यानुसार, उपविभागीय समिती व जिल्हास्तरीय समिती यांनी ग्रामसभांना कायद्याबद्दल माहिती देणे, तसेच कायद्यातील नियम समजावणे गरजेचे होते. परंतु काही अपवाद वगळता असे फारच कमी ठिकाणी झाल्याचे दिसते. तसेच अनेकदा स्थानिक जिल्हा प्रशासनाला वनहक्क कायद्याबद्दल पुरेशी माहिती नसते, तर काही वेळा वनहक्काची जिल्हास्तरीय समिती देखील तयार झालेली नसते. या कायद्याच्या अंमलबजावणीत बऱ्याच ठिकाणी वनखात्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष विरोधच दिसून येतो. कायद्याप्रमाणे जिल्हास्तरीय समितीने नामंजूर दावे फेरतपासणीसाठी व अपील प्रक्रियेसाठी पुन्हा पाठवणे आवश्यक असते. परंतु, अनेकदा दावेदार व ग्रामसभेला दावा नामंजूर झाल्याची कोणतीच सूचना मिळत नाही किंवा दावे नामंजूर होण्याची कारणे कळत नाहीत. योग्य कागदपत्रे न जोडता आल्यामुळे अनेक दावेदार आपल्या हक्काच्या जमीनपट्ट्याला मुकलेले दिसतात. जात प्रमाणपत्रे, नकाशे, निस्तार हक्काची कागदपत्रे इत्यादींचा या कागदपत्रांमध्ये समावेश असतो. बरीच कागदपत्रे स्थानिक पटवारी व वनाधिकाऱ्यांनी उपलब्ध करून देणे अपेक्षित असते. परंतु, अनेकदा हे अधिकारी यात दिरंगाई करताना दिसतात. छोट्या भूधारकांना किंवा शेती असून कागदोपत्री भूमिहीन वननिवासींसाठी हा प्रकार प्रचंड क्लेशदायक ठरतो. कागदपत्रांअभावी हक्काच्या शेतीवर कोणत्याच सरकारी योजनांचा लाभ घेता येत नसल्याने या नागरिकांची कोंडी होते.

अर्थात, अवैध किंवा खोटे वनहक्काचे दावे येतच नाहीत असे नाही. काही ठिकाणी राजकीय हेतू साधण्यासाठी, ग्रामसभांना झुगारून किंवा त्यांच्यावर दबाव आणून जंगलावर घुसखोरी करण्यात येत आहे. गुजरात व महाराष्ट्रामध्ये अपारदर्शक पद्धतीने केलेल्या केवळ दोन संक्षिप्त अहवालांवरून वन्यजीवप्रेमींच्या याचिकेत असे म्हटले आहे की वनहक्काची सर्वच प्रक्रिया अवैध आहे. काही अपवादात्मक उदाहरणांमुळे संपूर्ण कायदाच रद्द का करावा?

खोट्या वनहक्क दाव्यांवर आळा घालण्यासाठी काही पर्याय आहेत. प्रथम म्हणजे ग्रामसभांकडे जीपीएस तंत्रज्ञान देऊन शेतजमिनींची मोजणी व सीमांकन करणे. महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी व काही प्रमाणात ओडिशामध्ये या तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या प्रकारे केला आहे. उपग्रहाच्या माध्यमातून मिळणाऱ्या छायाचित्रांची माहिती ग्रामसभेपुढे सादर करून दाव्यांबद्दल निर्णय घेता येऊ शकते. दुसरा उपाय म्हणजे सामूहिक वनहक्कांवर लक्ष केंद्रित करता येऊ शकते. ओडिशातील नियामगिरीपासून महाराष्ट्रातील लव्हारीसारख्या छोट्या गावापर्यंत अनेक उदाहरणे आहेत जिथे सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभांनी नोंदवलेल्या विरोधामुळेच जंगलावरची घुसखोरी थांबली आहे. तसेच सामूहिक वनहक्क प्राप्त अनेक गावे वन नियोजनासाठी नवनवीन उपक्रम राबवत आहेत. परंतु, वनहक्क कायद्याचा अभ्यास करणाऱ्या काही संस्थांनी २०१६मध्ये प्रकाशित केलेल्या अहवालानुसार भारतात किमान-अपेक्षित सामूहिक वनहक्क क्षेत्रातील फक्त तीन टक्के क्षेत्र ग्रामसभांकडे हस्तांतरित केले गेले आहे. खेदजनक बाब ही आहे की, ठराविक एककल्ली वन्यजीवप्रेमी संस्थांनी कायद्यामुळे निर्माण झालेल्या अशा सकारात्मक बाबींकडे दुर्लक्ष केले आहे. वास्तविक पाहता, १९८०पासून खाणी, जलविद्युत प्रकल्प, औष्णिक विद्युत प्रकल्प व इतर उद्योगांसाठी स्थानिक वननिवासींना विस्थपित करून १५ लाख हेक्टरहून अधिक जंगल परिवर्तीत झाले आहे. वन्यजीवप्रेमी संस्थांनी व वननिवासींनी मिळून पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी एकत्रित काम करणे आवश्यक आहे. तसेच वन्यजीवप्रेमी संस्थांनी जंगल संवर्धन विषयक होणारे संशोधन ग्रामसभांपर्यंत पोहचवून स्थानिक जंगल संरक्षण अधिक शाश्वत करण्यात योगदान करायला हवे.

१९७०च्या दशकापासून रूढ झालेला वाघ, सिंह, हत्ती अशा प्राण्यांच्या संवर्धनाचा विचार हा फक्त 'मनुष्य-प्राणी संघर्ष' या एकाच दृष्टिकोनातून केला गेला. मात्र, हा विचार अलगतावादी (Isolationist Conservation) होता. प्राण्यांना अभयारण्यात संरक्षित करताना, अनेक वननिवासींना दुर्लक्षित केले गेले. परंतु, नवीन पर्यावरणशास्त्राचा अभ्यास हे

दाखवून देतो की, जैवविविधतेचे संवर्धन अलगतावादाने न करता एकत्मिकारणाने (Integration) होऊ शकते. कर्नाटकमधील सोलिगा आदिवासींच्या जंगलामधील (बिलिगिरीरंगनस्वामी बेटटा) वाढणारी वाघांची संख्या असो किंवा चंद्रपूर जिल्ह्यातील पाचगावमधील वननिवासींनी राखलेल्या नवीन देवराई असो, भविष्यात येऊ घातलेल्या एकात्मिक, न्यायी व शाश्वत पर्यावरणवादाची ही उदाहरणे साक्ष देत आहेत. आपण त्यांचे स्वागत करूया!

(केशव गुरनुले हे गडचिरोली जिल्ह्यातील सृष्टी संस्थेचे संस्थापक आहेत तर अनुजा दाते या अशोका ट्रस्ट फॉर रिसर्च इन इकॉलोजी अॅण्ड एन्व्हॉयर्नमेंट, बेंगळुरू येथे पीएच.डी.च्या विद्यार्थिनी आहेत.)

## संबंधित लेख

आणखी वाचा >



साधे जेवण १०० तर नॉनवेज २००; उमेदवारांसाठी मेनूकार्ड



उपराजधानीत १२० शस्त्रे झाली म्यान



उद्धव म्हणाले, मोदी मोठ्या भावासारखे!



रेल्वेप्रवासात झालेला मृत्यू हा अपघातच!

marathi News App: तुम्हालाही तुमच्या अवतीभवती होत असलेल्या बदलांमध्ये सहभागी व्हायचं आहे? सिटिझन रिपोर्टर अॅप डाउनलोड करा आणि रिपोर्ट्स पाठवा.ताज्या बातम्यांसह अपडेट राहण्यासाठी लाइक करा Maharashtra Times फेसबुकपेज